**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविम./माध्य.परीक्षा/ 3249
दिनांक - १३/०२/२०२४

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) मार्च २०२४ परीक्षेसाठी चित्रकला, शास्त्रीय कला, व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.**

**संदर्भ :-** १.राज्यमंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-७/१७४/दिनांक १५.०१.२०२४
२.राज्यमंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-७/६४२/ दि.१३/०२/२०२४

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) मार्च २०२४ परीक्षेसाठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांना ,चित्रकला, शास्त्रीय कला व लोककला प्रकारामधील सहभागासाठी सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यासंदर्भात शासकीय रेखाकला परीक्षेचा निकाल उशिरा लागल्याने चित्रकला, शास्त्रीय कला व लोककलेचे प्रस्ताव सादर करण्यास राज्यमंडळाचे उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. ०१ अन्वये दिनांक १० फेब्रुवारी २०२४ अशी मुदतवाढ देण्यात आलेली होती.

मुदतवाढीनंतर काही तांत्रिक अडचणीमुळे वाढीव मुदतीत माध्यमिक शाळांना अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव सादर करता आले नसल्याने कोणताही पात्र विद्यार्थी अतिरिक्त गुणांपासून वंचित राहू नये म्हणून राज्यमंडळ पुणे यांचे उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. ०२ अन्वये चित्रकला, शास्त्रीय कला व लोककलेचे प्रस्ताव शुक्रवार **दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत माध्यमिक शाळांकडून स्विकारण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. सदरची मुदत वाढ अंतिम असेल त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदत वाढ देण्यात येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(सुभाष रा. चौगुले )
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर